# कुख्यात रिंदाचे वडिल व भाऊ अटकेत

## ४ डिसेंबरपर्यंत कोठडी -मोक्का अंतर्गत कारवाई

**नांदेड/ प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कुख्यात अतिरेकी म्हणून घोषित केलेल्या हरविंदरसिंघ रिंदा याचे वडील व भावाला नांदेड पोलिसांनी मोक्का अंतर्गत अटक केली आहे. त्यांना येथील न्यायालयात हजर केले असता दोघांनाही ४ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे.



कुख्यात आंतरराष्ट्रीय दहशतवादी हरविंदरसिंघ उर्फ रिंदा संधू हा गत काही वर्षात अनेक कारवायांमध्ये गाजत आहे. गत काही महिन्यांपासून तो पाकिस्तानी आयएसआयचा हस्तक म्हणून काम करीत असल्याचे केंद्र सरकार व पंजाब पोलिसानी उघड केले. रिंदाने नांदेडमधून वसूल केलेल्या खंडणी प्रकरणात त्याचा मित्र भरत पोपटानी याला यापूर्वीच अटक करण्यात आली असून त्याने दिलेल्या जबाबानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलिस निरीक्षक द्वारकासदास चिखलीकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलिस ठाण्यात गुरनं ११९/२३ दाखल करण्यात आला . त्यात आरोपी म्हणून रिंदाचे वडील चरणसिंघ संधू आणि त्याचा भाऊ सरबज्योतसिंघ संधू यांची नावे होती.मात्र या दोघांना अटक करण्यात आली नव्हती.शहर उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज गुरव व सहकाऱ्यांनी या दोघांनाही दि. २८ नोव्हेंबर रोजी अटक केली आणि दि. २९ नोव्हेंबर रोजी नांदेडच्या विशेष न्यायालयाचे न्या.सी.व्ही.मराठे यांच्यासमोर या दोघांना हजर करण्यात आले. त्यावेळी सुरज गुरव व सहाय्यक सरकारी वकील ॲड.यादव तळेगावकर यांनी या दोघांना पोलिस कोठडी देण्याची मागणी केली. न्यायालयाने ४ डिसेंबरपर्यंत या दोघांना मोक्का अंतर्गत पोलिस कोठडी दिल्याचे गुरव यांनी सांगितले.

---

# टेरर फंडिंग प्रकरणी रिंदाच्या वडिलांसह भावाला अटक

## सहा दिवसांची कोठडी

नांदेड,दि.२९: संघटित गुन्हेगारीतून खंडण्या वसूल करणे व त्याचा उपयोग दहशतवादी कारवायांसाठी टेरर फंडिंग करणे या आरोपाखाली कुख्यात दहशतवादी हरविंदरसिंघ रिंदा याच्या वडीलासह त्याच्या भावाला पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने उपरोक्त दोन्ही आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. रिंदाच्या वडिलाला तसेच भावाला अटक केल्यानंतर चोख पोलीस बंदोबस्तात त्यांना न्यायालयात आणण्यात आले.

इंटरपोलने हरविंदरसिंग उर्फ रिंदा याला राष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित केले आहे. खंडण्या वसूल करणे, तसेच खून यासह अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद शहरातील विविध पोलीस ठाण्यात नोंद असली तरी त्याच्या नावावर धनाढ्य लोकांकडून खंडणी वसूल करण्याचे उद्योग झाल्याचे समोर आल्यानंतर त्याच्या विरुद्धही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, रिंदासाठी काम करणाऱ्या त्याच्या मित्रालाही पोलिसांनी अटक केली होती. शहरात खंडणीचे प्रकार वाढल्यानंतर रिंदाच्या दहशतीमुळे तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नव्हते.

दरम्यान, याप्रकरणी एलसीबीचे तत्कालीन अधिकारी द्वारकादास चिखलीकर यांनी वजिराबाद पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास डीवायएसपी सुरज गुरव यांच्याकडे देण्यात आला होता. या तपासात पोलिसांना काही महत्त्वाची माहिती प्राप्त झाल्यानंतर रिंदाचे वडील चरणसिंग संधू आणि त्याचा भाऊ सरबज्योतसिंघ संधू या दोघांना अटक करण्यात आली. या दोघांना चोख पोलीस बंदोबस्तात न्यायालयात आणण्यात आले. या वेळी खंडणीतून वसूल केलेल्या पैशाचा उपयोग कुठे केला, कोण- कोणत्या प्रॉपर्टी तसेच जमिनी खरेदी केल्या या सर्वांचा इन्कम सोर्स काय आहे, हा सर्व तपास करायचा आहे. असा युक्तिवाद सरकार पक्षाच्यावतीने करण्यात आला. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायाधीश सी. व्ही. मराठे यांनी चरणसिंग संधू आणि सरबज्योतसिंग संधू या दोघांना ४ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.